
# कार्य-कर्तव्य

• प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील

# सेवा गौरवग्रंथ



Scanned by CamScanner

डॉ.जगन्नाथ पाटील

प्रमुख संपादक
प्रा.डॉ.जे.एफ. पाटील

संपादक मंडळ
प्रा.सुभाष दगडे
प्रा.डॉ.एल.एन.घाटगे
प्रा.विनायक जाधव
प्रा.एन.एम.चोबे
प्रा.एस.के.आतार
प्रा.एस.के.लोखंडे
प्रा.सागर चव्हाण

# कार्य-कर्तव्य

• प्राचार्य डॉ.जगन्नाथ पाटील

## सेवा गौरवग्रंथ

ISBN : 978-93-5737-246-6

संपादक : प्रा.डॉ.जे.एफ्.पाटील

प्रकाशक : डॉ.विजयकुमार जगन्नाथ पाटील
ओम प्लॉट नं.८, आदर्श कॉलनी,
विलासपूर, गोडोली, सातारा : ४१५००१.
भ्रमणध्वनी : ८९५६१२४२९०, ८१४९२३९१५३

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ती : १८ सप्टेंबर, २०२२

मुखपृष्ठ : सौ.मीनाक्षी जगन्नाथ पाटील
भ्रमणध्वनी : ७२४९३०९०३७

मुद्रक व अक्षरजुळणी : श्री.जतिन अशोक शहा
प्रिंट ओम ऑफसेट,
२६९/१२, दौलतनगर, सातारा : ४१५००२
भ्रमणध्वणी : ८८०५८७७९००

स्वागत मूल्य : रुपये तीनशे फक्त

# अनुक्रमणिका - विभाग - २

## रोजगार, बेरोजगार : भारतीय अर्थव्यवस्था आणि बेरोजगारी या विषयावरील संदर्भ ग्रंथासाठीचा लेख संग्रह


| अं.क्र. | लेखकाचे नांव | नांव | पृष्ठ संख्या |
|---|---|---|---|
| १ | डॉ. संतोष दास्ताने | रोजगार-मूलभूत घटनात्मक अधिकार | ९३ |
| २ | प्राचार्य डॉ संजय धनवटे | भारतातील माहिती तंत्रज्ञान आणि बेरोजगारी व रोजगारीचे धोरण | ९९ |
| ३ | डॉ. लालासाहेब ना.घाटगे | भारतीय सेवाक्षेत्रातील बेरोजगारी : एक आव्हान | १०४ |
| ४ | डॉ.आर.वाय.माहोरे | रोजगार आणि केंद्र सरकारच्या योजना | ११२ |
| ५ | प्रो.डॉ.अनिलकुमार कृ.वावरे | भारतातील बेरोजगारी-रोजगार धोरण संदर्भातील तज्ञांचे अभ्यास व पाहणी अहवालाचे निष्कर्ष | ११८ |
| ६. | डॉ. अनिल पडोशी | बेरोजगारी, सरकार आणि अर्थिक सुधारणा | १२५ |
| ७. | प्रा. संजय ठिगळे | भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगाराचे बदलते स्वरूप | १२८ |
| ८. | डॉ. बंडू जयशिंग कदम | रोजगाराचे सैध्दांतिक विवेचन | १३३ |
| ९. | प्रा. डॉ आर.बी. भांडवलकर | संघटित क्षेत्रातील बेरोजगारी आणि रोजगार धोरण | १४० |
| १०. | डॉ. आर.एस. सोळुके आणि डॉ. शिवाजी पाते | भारतातील कृषी क्षेत्र आणि महिला रोजगार | १४६ |
| ११. | प्रा. राजाराम कांबळे | भारतीय अर्थव्यवस्थेतील विषमतेचा प्रश्न, बेरोजगारी आणि रोजगारीचे धोरण | १५३ |
| १२. | प्रा. डॉ. शिवाजी भोसले आणि डॉ.जी.सी.खामकर | कृषी क्षेत्रातील बेरोजगारी व रोजगार धोरण | १५९ |
| १३. | प्रो. डॉ. अशोक खाचणे आणि डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे | भारतीय अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचा प्रश्न आणि रोजगाराचे धोरण | १६४ |
| १४. | डॉ. शैलजा कालिदास माने | असंघटित कामगार | १७२ |
| १५. | प्रा. राहुल बबनराव यादव | उद्योग क्षेत्रातील बेरोजगारी आणि रोजगाराचे धोरण | १७६ |
| १६. | प्रा. डॉ. संतोष फरांदे | भारतातील बेरोजगारी, रोजगार धोरण या संदर्भात राजकीय नेतृत्वाचे योगदान | १८० |
| १७. | डॉ. संतोष यादव | भारतातील बेरोजगारीचे वास्तव | १८५ |
| १८. | डॉ.एम.एस.देशमुख | भारतीय अर्थव्यवस्था, बेरोजगारी व तरुणाईचे भविष्य | १८८ |
| १९. | प्रा.सौ.एकता जाधव | महिला अद्योजकता विषयीचे धोरण | १९५ |
| २०. | प्रा. एम.जी.पाटील आणि डॉ.उल्हास माळकर | रोजगार व राज्य सरकारच्या योजना | १९९ |
| २१. | प्रा. डॉ. सुनिता तेलसिंगे | भारतातील महिला-बेरोजगारी व रोजगाराचे धोरण | २०३ |
| २२. | डॉ.सचिन कुंभार आणि श्री.निलेश कोळी | भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि रोजगार | २०९ |
| २३. | प्रा.सुभाष दिगंबर दगडे | भारतातील बेरोजगारीची समस्या आणि भारतीय संविधानातील तरतूदी | २१६ |
| २४. | प्राचार्य डॉ.अशोक करांडे | बेरोजगारी-शिक्षणक्षेत्रातील | २२४ |
| २५. | मा.मनोहर साळुंखे | शेतातील रोजगाराची वास्तवता | २२७ |
| २६. | मुलाखत | शेताच्या बांधावरून | २२९ |
| २७. | Dr.Anna K. Patil | Present Status of Employment in Indian Economy | २३३ |
| २८. | Jayamala Arjun Uthale | Poverty In Indian Economy : policies of poverty and unemployment in India | २३७ |
| २९. | Mrs.Priyanka Suyog Patil | Impact of Economic Reform on Employment | २४२ |


Scanned by CamScanner





# भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि रोजगार




डॉ.सचिन भास्कर कुंभार, कु.निलेश रविंद्र कोळी
डॉ.अण्णासाहेब जी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

**आंतरराष्ट्रीय व्यापार :** वस्तू आणि सेवा यांची आंतरराष्ट्रीय पातळीवर होणारी आयात-निर्यातसेवांमध्ये वाहतूक, विमा, बँकव्यवसाय, प्रवाशांनी केलेला खर्च ह्यासारख्या गोष्टींचा समावेश असतो. वस्तूंच्या व्यापाराचा निर्देश 'दृश्य व्यापार' व सेवांच्या व्यापाराचा निर्देश 'अदृश्य व्यापार' म्हणून केला जातो.

विकसनशील भारतासारख्या देशाला तर आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फार महत्व असते. आपला आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या देशांना उत्पादनक्षमता तीव्र गतीने वाढविणे आवश्यक असते. भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमयाच्या दरात मोजल्यास जगातील १२ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. भारताचे वार्षिक सकल उत्पन्न १,०८९ अब्ज डॉलर एवढे आहे. निष्कर्ष लावला तर भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीन पाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच विविधता दिसून येते. शेती, हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन-तृतीयांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगांवर चालतो, परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाटा वाढत आहे आणि अलिकडे सेवांवर आधारित व्यवसायही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्वाची भूमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळेच तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्यस्त्रोताच्या सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावयाला लागला आहे. भारत हा अति-कुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याच बरोबर उत्पादन, औषध निर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्मतंत्रज्ञान, दूरसंचार, जहाज निर्माण, विमान निर्माण आणि पर्यटन ह्या क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढत आहे.

वर्ष २०२१-२२ साठी निर्धारित केलेले ४०० अब्ज अमेरिका डॉलरचे महत्त्वाकांक्षी व्यापारी माल निर्यात लक्ष्य गाठण्यासाठी भारताची योग्य वाटचाल आर्थिक सर्वेक्षणानुसार देशात भांडवली ओघ वाढत असल्याने परकीय चलन गंगाचळीत जलद संचयन होत आहे. महामारीमुळे मागील वर्षीच्या घसरणीनंतर वर्ष



Scanned by CamScanner





२०२१-२२ मध्ये भारताच्या परदेशी व्यापारात मजबूत वाढ होऊन देशात भांडवली ओघ वाढत असल्याने परकीय चलन गंगाजळीत जलद संचयन होत आहे. आर्थिक सर्वेक्षण २०२१-२२ नुसार चालू वर्षात भारताच्या बाह्य क्षेत्राची लवचिकता अर्थव्यवस्थेतील वाढीच्या पुनरूज्जीवनासाठी चांगली आहे.

**विदेशी व्यापाराची स्थिती :**

सर्वेक्षणात असे नमूद करण्यात आले आहे की, देशांतर्गत उपक्रमांच्या पुनरुज्जीवनासह जागतिक मागणीच्या पुनप्राप्तीमुळेच आर्थिक वर्षात भारताच्या व्यापारी मालाची निर्यात आणि आयात जोरदार वाढली आणि तिने कोविड पूर्वीची पातळी ओलांडली. सरकारने वेळोवेळी घेतलेल्या पुढाकारामुळे निर्यातीत पुनरुज्जीवन होण्यास मदत झाली. एप्रिल-नोव्हेंबर २०२१ मध्ये अमेरिकेनंतर संयुक्त अरब अमिरात आणि चीन ही सर्वोच्च निर्यातीची ठिकाणे होती. तर चीन, संयुक्त अरब अमिरात आणि अमेरिका हे भारतासाठी सर्वात मोठे आयात स्रोत होते. पर्यटन महसूल तुटपुंजा असूनही, एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीत पावत्या आणि देयके या दोन्हींना महामारीपूर्व पातळी ओलंडल्याने तसेच मजबूत सॉफ्टवेअर आणि व्यायसायिक उत्पन्नाच्या कारणास्तव निव्वळ सेवा प्राप्तींमध्ये लक्षणीय वाढ झाली, यामुळे सेवा क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात रोजगार वाढण्यास मदत झालेली आहे.

आर्थिक सर्वेक्षणात असे नमूद केले आहे की, वर्ष २०२१ च्या पहिल्या सहामाहीत जागतिक आर्थिक उपक्रमांचा वेग वाढल्यामुळे महामारी पूर्वीच्या उच्चांकांपेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापार जास्त होता. त्यात म्हटले आहे की, भारताच्या आंतरराष्ट्रीय निर्यातीने जागतिक कलाचे अनुसरण केले आहे, आणि एप्रिल ते डिसेंबर २०२१ दरम्यान आंतरराष्ट्रीय निर्यात ४९.७% ने वाढली आहे, गेल्या वर्षीच्या (एप्रिल-डिसेंबर) च्या तुलनेत ती २६.५%. सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे की भारताने २०२१-२२ साठी निर्धारित केलेल्या ४०० अब्ज अमेरिका डॉलरच्या महत्त्वाकांक्षी निर्यात लक्ष्यापैकी ७५% पेक्षा जास्त लक्ष आधीच गाठले आहे आणि भारत तो लक्ष्यपूर्तीच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. आंतरराष्ट्रीय आयातीच्या मुद्द्यावर, आर्थिक सर्वेक्षणात असे म्हटले आहे की, भारताने देशांतर्गत मागणीत पुनरूज्जीवन केले आहे परिणामी मजबूत आयात वृध्दी झाली आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२१ मध्ये व्यापारी मालाची आयात ही ६८.९% एवढी वेगाने वाढली महामारीपूर्वीची पातळी ओलांडत ६८.९% दराने गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत वाढली आणि एप्रिल-डिसेंबर २०१९ च्या ती मात्र मागच्या वर्षी याच कालावधीत ती फक्त एप्रिल डिसेंबर २०१९ ला फक्त २१.९% दराने वाढ झाली. अर्थ असा २०१९ च्या तुलनेत २०२१ च्या तुलनेत २०२१ ला आपली निर्यात वेगाने वाढली व त्यामुळे निर्यातक्ष उद्योगांमध्ये रोजगार पातळीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.



Scanned by CamScanner




**सेवा व्यापार :**

कोविड-१९ नंतरच्या काळात भारताने जागतिक सेवा व्यापारात आपली प्रभावी कामगिरी कायम ठेवली आहे, गेल्या वर्ष २०२० ला या कालावधीत भारतातील सेवा क्षेत्राची निर्यातीत झालेली वाढ १८.५४% होती. तीच निर्यात २०२१ ला फक्त वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीत सेवा निर्यात १८.४% ने वाढून १७७.७ अब्ज अमेरिका डॉलर झाली आहे. सर्वेक्षणात असे म्हटले आहे की, सेवा निर्यातीत झालेल्या मजबूत वाढीचे श्रेय सरकारने हाती घेतलेल्या प्रमुख सुधारणांना देखील दिले जाऊ शकते. एप्रिल-डिसेंबर २०२१ मध्ये सेवा आयात २१.५% ने वाढून १०३.३ अब्ज अमेरिकी डॉलर झाली. त्यामुळे सध्या वाढत्या सेवा क्षेत्राचा आकार बघता यात रोजगाराच्या संधी अधिकाधिक वाढताना दिसतात.

२०२१-२२ मध्ये व्यापारासाठी ४०० अब्ज डॉलर्सची निर्यात करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. यासाठी भूतकाळातील कल, वर्तमानातील परिस्थिती तसेच भारत आणि उर्वारित जगामध्ये धोरणात्मक गतिशीलता यांचा आधार घेतला आहे. नोव्हेंबर २०२१ पर्यंत भारताची निर्यात ४०० अब्ज डॉलर उद्देशाच्या ६५.८९टक्के झाली आहे. डीजीएफटीच्या सांख्यिकी विभागाअंतर्गत 'एक्सपोर्ट मॉनिटरींग डेस्क'ची स्थापना केली असून त्याद्वारे लक्ष्य साध्य करण्यासाठी दरमहा निरीक्षण केले जाते.

**निर्यातवाढ :**

व्यापारी माल-चालू आर्थिक वर्षामध्ये सलग ८ व्या महिन्यात ३० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निर्यात झाली आहे. भारताची निर्यात क्षेत्रामध्ये अतिशय उत्तम कामगिरी झाली आहे. गेल्या वर्षी एप्रिल-नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये १७४.१६ अब्ज डॉलर्सची निर्यात झाली. तर २०२१ याच कालावधीमध्ये २६३.५७ अब्ज डॉलर्स एवढ्या प्रमाणात निर्यात वाढ झाली आहे. ही सकारात्मक वाढ आहे. सेवा-गेल्या वर्षी महामारीच्या काळामुळे भारताच्या सेवा निर्यातीमध्ये लवचिकता होती. जागतिक व्यावसायिक सेवा निर्यातीमध्ये २०१९ मध्ये भारताचा हिस्सा ३.% टक्के होता त्यामध्ये वाढ होवून तो २०२० मध्ये ४.१ टक्के झाला आहे. सतत होणाऱ्या निर्यात वाढीमुळे रोजगार पातळीत देखील लक्षणीय वाढ होताना दिसते.

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव :**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वाणिज्य विभागाने २० ते २६ सप्टेंबर, २०२१ या काळामध्ये वाणिज्य सप्ताहाचे आयोजन केले होते. यामुळे भारत आंतरराष्ट्रीय व्यापार परिसंस्थेमधल्या प्रत्येक भागीदाराला जागतिक स्पर्धेत टिकून राहू शकणारी दर्जेदार उत्पादने तयार करण्यासाठी कशा प्रमारे सक्षम करता येईल, हे



Scanned by CamScanner

अधोरखित करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमांचे आयोजन केले. वाणिज्य सप्ताहाच्या काळामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केल. यामध्ये काही विशिष्ट संकल्पनांचा विचार करण्यात आला. १) टुबर्डस ग्रेटर सेल्फ रिलायन्स, २) शायनिंग इंडिया-उद्योनमुख आर्थिक शक्ती ३) हरित आणि स्वच्छ सेझ, ४) वाणिज्य उत्सव ५) शेतापासून ते विदेश भूमीपर्यंत ! इत्यादी सर्व गोष्टींचा सरकारच्यावतीने आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रामध्ये पाठपुरावा करण्यात येत आहे. यामुळे नक्कीच देशातील रोजगार, उत्पन्न वाढून देशाचा आर्थिक विकासाचा स्तर उंचावण्यास मदत मिळेल.

**ईज ऑफ डुइंग बिझनेस - व्यवसायाचे सुलभीकरण**

महामारीच्या काळामध्ये स्थिरचा प्रदान करण्यासाठी परकीय व्यापार धोरणाचा (एफटीपी) २०१५-२०२० काळ २०२१-२०२२ पर्यंत वाढविण्यात आला. एकात्मिक वस्तू आणि सेवा कर आणि ॲडव्हान ऑथरोयझेशन (ii), ईपीसीजी, ईओयू योजनेअंतर्गत उपकारतून देण्यात येणारी सवलत ३१ मार्च २०२२ पर्यंत वाढविण्यात आली. ईज ऑफ डुइंग बिझनेस-व्यवसायाचे सुलभीकरण यामार्फत आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक धोरण बळकट करून निर्यात वाढविणे या हेतूने सरकारने हा उपक्रम हाती घेतलेला आहे व याचचं परिपाक म्हणून देशातील अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

**निर्यात उत्पादनावरील शुल्क आणि कर माफी योजनेची अंमलबजावणी :**

आरओडीटीईपी म्हणजे निर्यात केलेल्या मालावर उत्पादन शुल्क आणि कर माफ करण्याची योजनेची अधिसूचना १ जानेवारी २०२१ पासून जारी करण्यात आली आहे. या योजनेमध्ये कर/उपकर/इतर शुल्क यांच्या प्रतिपूर्तीसाठी एक यंत्रणा तयार करण्यात येत आहे. सध्या कोणत्याही यंत्रणेअंतर्गत अशा प्रकारे प्रतिपूर्ती करता येत नाही. मात्र या यंत्रेणमार्फत केंद्र, राज्य आणि स्थानिक स्तरावर आणि निर्यात करावयाच्या उत्पादनाची निर्मिती करणे आणि तिच्या वितरणाच्या प्रक्रियेसाठी येणारा खर्च केला जातो. या मागचा सरकारचा हेतू असा की, निर्यातीवर कर कपात करून जागतिक बाजारपेठेमध्ये विविध भारतीय वस्तू विक्री करणे आणि भारतीय वस्तूंची जागतिक स्तरावर मागणी वाढून देशातील उत्पादन, उत्पन्न पातळी, रोजगार पातळी वाढून देशाचा वेगाने आर्थिक विकास साधने हा आहे.

**निर्यात योजनेसाठी व्यापार पायाभूत सुविधा :**

वाणिज्य विभागाच्यावतीने टीआयईएस लागू केली जात आहे. निर्यात क्षेत्रात स्पर्धा वाढीस लागवी या उद्देशाने, आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये निर्यातदारांसाठी आवश्यक असणाऱ्या अनेक पायाभूत सुविधा विकसित केल्या होत्या. या योजनेचा काळ आता पाच वर्षांनी वाढविण्यात आला आहे. त्यानुसार ही योजना २०२१-२२ ते २०२५-२६ पर्यंत सुरू राहणार आहे. या योजनेसाठी अंदाजपत्रकामध्ये एकूण



Scanned by CamScanner

३६० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी २०२१-२२ मध्ये या योजनेसाठी ७५ कोटी खर्च करता येणार आहेत. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ८ डिसेंबर २०२१ पर्यंत या योजनेत एकूण ११३ कोटींच्या खर्चाला टीआयईएस निधीसह नवीन प्रकल्पांसाठी संबंधित अधिकारप्राप्त समितीने मान्यता दिली. जेणेकरून नवीन प्रकल्प उभे राहिलेत तर नवीन रोजगाराच्या संधी देखील निर्माण होतील, यासाठी सरकारने निर्यात योजनेसाठी व्यापार पायाभूत सुविधांवर देखील लक्ष केंद्रित केलेले दिसते.

**कृषी निर्यात धोरण :**

शेतकरी सहकारी संस्थाबरोबर निर्यातीची व्यवस्था बळकट करण्यासाठी नाफेडबरोबर एपीईडीएने सामंजस्य करार केला. ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस (एडब्ल्यूएस)च्या समूहाबरोबर झालेल्या परस्पर संवादानुसार जी आय हापूस आंब्यासाठी 'ब्लॉकचेन ट्रेसेबिलिटी' आणि एपीईडीए पॅकहाऊसमध्ये डिजिटल तपासणी करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांसाठी दोन पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी मान्यता देण्यात आली. ग्रेपनेटमध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञान, एपीईडीएने त्यांच्या ग्रेपनेट ट्रेसिबिलिटी प्रणालीचा भाग म्हणून ब्लॉकचेन पर्याय लागू केला आहे. जेणे करुन भारतातील कृषी उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली किंमत मिळेल व कृषी उत्पादन मागणी नुसार उत्पादनात वाढ करण्यासाठी कृषी क्षेत्रातील रोजगार मागणी वाढेल.

**मेक इन इंडिया :**

'स्टार्टअप इंडिया योजना' म्हणजे रोजगार निर्मिती आणि संपत्ती निर्मितीसाठी भारत सरकाने घेतलेला पुढाकार आहे. स्टार्टअप इंडियाचे उद्दिष्टय म्हणजे उत्पादने आणि सेवांचा विकास करणे, त्यात नाविन्यपूर्णता आणणे आणि भारतातील रोजगार दर वाढवणे. स्टार्टअप इंडिया योजनेचा फायदा म्हणजे कामाचे सुलभीकरण, आर्थिक सहाय्य, सरकारी निविदा, २०१६ मध्ये सरकारने सुरू केलेली नेटवर्किंगची संधी, बिम्सटेकमध्ये दक्षिण आणि दक्षिण पूर्व अशियामधल्या बांग्लादेश, भारत, नेपाळ म्यानमार, भूतान, थायलंड आणि श्रीलंका यांचा समावेश आहे. आशिया पॅसिफिकमध्ये बिम्सटेक महत्त्वाचे व्यापारी क्षेत्र बनलं आहे. बिम्सटेकमध्ये असियान सदस्यांचाही (थायलंड व म्यानमार) समावेश आहे. पूरक गोष्टींचे नेटवर्क विकसित करणे आणि जास्तीत जास्त आर्थिक मदत करणे, हेच बिम्सटेकचे उद्दिष्ट आहे.

**१. भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून विकसित करणे :**

'मेक इन इंडिया' द्वारे, सरकार विविध देशांतील कंपन्यांना भारतात कर सूट देऊन त्यांचे उद्योग भारतात सुरू करण्यास प्रोत्साहित करेल जेणेकरुन भारताचे आयात शुल्क कमी होईल आणि रोजगार मिळेल.



Scanned by CamScanner



**२. भारताच्या आर्थिक विकासाला चालना देणे :**

'मेक इन इंडिया' मुळे निर्यात आणि उत्पादनात वाढ होईल. परिणामी अर्थव्यवस्था सुधारेल आणि विद्यामान तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक गुंतवणकीद्वारे भारत उत्पादनाच्या जागतिक केंद्रात बदलेल. भारताच्या GDP मध्ये सध्या उत्पादन क्षेत्रात वाटा फक्त १६% आहे आणि २०२० पर्यंत के २५% पर्यंत वाढवण्याचे सरकारचे उद्दिष्ट्य आहे.

**३. अधिक रोजगाराच्या संधी :**

'मेक इन इंडिया' याद्वारे, सरकार मुद्रा योजनेसारख्या कार्यक्रमांद्वारे नवकल्पना आणि उद्योजकता कौशल्यांमध्ये कुशल तरूणांना आर्थिक सहाय्य प्रदान करेल, जेणेकरून देशात नवीन स्टार्ट-अप कंपन्या विकसित होतील, ज्या रोजगाराच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण ठरतील. या अंतर्गत एकूण २५ क्षेत्रांच्यार विकासावर लक्ष दिले जाईल, ज्यातून सुमारे दहा लाख लोकांना रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे.

**४. अधिक एफडीआय आकर्षित करण्याची संधी :**

सरकारने आयोजित केलेल्या 'मेक इन इंडिया वीक' मध्ये ६८ देशांतील २५०० आंतरराष्ट्रीय आणि ८००० देशांतर्गत प्रतिनिधींनी भाग घेतला होता. उखझझ सचिव अभिताभ कांत म्हणाले की, त्यांना १५.२ लाख कोटी रूपयांची गुंतवणूक वचनबध्दता आणि १.५ लाख कोटी रूपयांच्या गुंतणुकीची माहिती मिळाली होती.

**५. भारतातील संरक्षण गुंतवणुकीला चालना :**

ऑगस्ट २०१५ मध्ये, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) 'मेक इन इंडिया' कार्यक्रमांतर्गत, रशियाच्या इर्कुट कॉर्पने सुखोई S-30MKI लढाऊ विमानांच्या ३३२ भागांचे तंत्रज्ञान भारतात हस्तांतरित केले. मेक इन इंडिया लाँच केल्यानंतर, भारत गुंतवणुकीसाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांची पहिली पसंती बनला आणि सन २०१५ मध्ये, भारताने ६३ अब्ज अमेरिकन डॉलर्सने थेट विदेशी गुंतवणूक प्राप्त करण्यासाठी अमेरिका आणि चीनला मागे टाकले. यानंतर २०१६ मध्ये जगभरात आर्थिक मंदी असूनही ,भारताला सुमारे ६०अब्ज डॉलरची थेट परकीय गुंतवणूक मिळाली, जी जागतिक अनेक विकसित देशांपेक्षा खूप जास्त होती.

**निष्कर्ष** (Conclusion)

१. अर्थिक सर्वेक्षणात असे नमूद केले आहे की वर्ष २०२१ च्या पहिल्या सहामाहीत जागतिक आर्थिक उपक्रमांचा वेग वाढला, ज्यामुळे महामारी पूर्वीच्या उच्चांकापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापार जास्त होता. त्यात म्हटले आहे की, भारताच्या आंतरराष्ट्रीय निर्यातीने जागतिक कलाचे अनुसरण केले आहे आणि एप्रिल ते डिसेंबर २०२१ दरम्यान आंतरराष्ट्रीय निर्यात ४९.७% ने वाढली आहे.



Scanned by CamScanner




२. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत आणि २०१९-२० (एप्रिल-डिसेंबर) च्या तुलनेत २६.५% सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे की भारताने २०२१-२२ साठी निर्धारित केलेल्या ४०० अब्ज अमेरिकी डॉलरच्या महत्वाकांक्षी निर्यात लक्ष्यांपैकी ७५% पेक्षा जास्त आधीच गाठले आहे आणि तो लक्ष्यपूर्तीच्या मार्गावर आहे.

३. जागतिक व्यावसायिक सेवा निर्यातीमध्ये २०१९ मध्ये भारताचा हिस्सा ३.५ टक्के होता त्यामध्ये वाढ होवून तो २०२० मध्ये ४.१ टक्के झाला आहे.

४. व्यापारी मालाची चालू आर्थिक वर्षात ३० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निर्यात झाली आहे.

५. गेल्या वर्षी एप्रिल-नोव्हेंबर २०20 कालावधीमध्ये १७४.१६ अब्ज डॉलर्सची निर्यात झाली. तर यंदा याच कालवधीमध्ये ५१.३४ टक्के जास्त म्हणजे २६३.५७ अब्ज डॉलर्स इतकी निर्यात झाली आहे.

६. आंतरराष्ट्रीय शिखर परिषद ही आंतरराष्ट्रीय स्टार्टअपसाठी मिळून काम करायचला प्रोत्साहन देते. त्याबरोबर परस्पर विकासासाठी देशांमध्ये मानवी आणि भांडवलाची संसाधने समजून घेण्यास आणि ती वाटप करण्यास मदत होत आहे.

७. देशाच्या वेग-वेगळ्या कोपऱ्यात राहणाऱ्या बेरोजगार तरूणांची ऊर्जा सर्वांसमोर मांडणे जे भारताच्या लोकसंख्येत ऊर्जेचे केंद्र समजले जाऊ शकतात. ते बेराजगार तरूण भारत आणि जगाच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्वाचे आहेत.

## **संदर्भ सूची** (References)


१) दत्त आणि सुंदरम (गौरव दत्त) - भारतीय अर्थव्यवस्था (५५ वी आवृत्ती)
2) httphttps://Maharahstratimes.com
3) pib.gov.in
4) https://www.bbc.com/marathi/India
5) https://marathi.thewire.in
6) https://mr.vikaspedia.in
7) https://www.drishtiias.com
8) https://www.orfonline.org
9) https://vishwakosh.marathi.gov.in
10) https://www.etvbharat.com
11) https://marathi.thewire.in/international-labour-organization-report-india-poor


□ □ □ □



Scanned by CamScanner